# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-27.08.2026** **वार- गुरुवार**

---

**मोदी**

२१व्या शतकातील भारतासाठी आधुनिक क्रीडा परिसंस्था उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. खेलो इंडिया संवादाला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. क्रीडा क्षेत्र हे केवळ पदकं जिंकण्यापुरतं मर्यादित नसून, देशातील क्रीडा क्षमता आणि युवा शक्ती एकत्र आणून विकसित भारताच्या उभारणीसाठीचं अभियान असल्याचं त्यांनी नमूद केलं. प्रत्येक जिल्ह्यात जागतिक क्रीडा नकाशावर चमकण्याची क्षमता असल्याचंही मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी आज देशभरातील ठिकठिकाणच्या तरुणांशी आणि खेळाडूंशी संवाद साधला.

हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. या उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी आभासी संवादाद्वारे खेळ, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केलं.

**मोदी**

दरम्यान, पुण्यातील खडकी शिक्षण संस्थेचं टी. जे. महाविद्यालय तसंच अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठात देखील या कार्यक्रमाचं आज आयोजन करण्यात आलं होतं.
केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नेमबाज हिना सिद्धू, तिरंदाज शर्वरी शेंडे आणि टेनिसपटू ऋतुजा भोसले या मान्यवर खेळाडूंचाही या कार्यक्रमात सहभाग होता. खेळामुळे युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, चिकाटी आणि आव्हानांना सामोरं जाण्याची क्षमता विकसित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळात सहभाग घ्यावा, असं आवाहन मोहोळ यांनी केलं.

यावेळी विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितांनी 'नशामुक्ती'ची सामूहिक शपथ घेतली. खडकी क्षेत्र हे क्रीडाक्षेत्राची जननी आहे. खेलो इंडिया मोहिमे अंतर्गत राष्ट्रीय खेळाला प्रोत्साहन मिळत असून विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती तयार होत आहे. अशी भावना खडकी इथल्या टी. जे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी व्यक्त केली.
विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे 'खेलो इंडिया संवाद' कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

**सण**

आज नारळी पौर्णिमेचा सण आहे.तर उद्या रक्षाबंधन आहे.या सणांनिमित्त नवीन कपडे, दागिने, मिठाई तसंच भेटवस्तू घेण्यासाठी शहरातील बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी झाली आहे. आकर्षक आणि वैविध्यपूर्ण राख्यांनी शहर तसंच उपनगरांतील दुकानं सजली आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नारळी पौर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**ऊस-गाळप**

राज्यातील साखर कारखान्यांसाठी यंदाच्या ऊस गाळप हंगामाच्या ऑनलाइन परवाना अर्जाची प्रक्रिया येत्या १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. कारखान्यांना ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी गाळप सुरू करण्यापूर्वी परवाना घेणं बंधनकारक आहे. परवाना न घेता गाळप सुरू केल्यास किंवा अटींचं उल्लंघन केल्यास संबंधित कारखान्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिला आहे.

**डेंग्यू-अळ्या-नोटीस**

पिंपरी-चिंचवड शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेनं केलेल्या सर्वेक्षणात २ हजार २ शे ६१ घरांमध्ये आणि २ हजार ४ शे २८ कंटेनरमध्ये डेंग्यूच्या अळ्या आढळल्या आहेत. याप्रकरणी मनपानं २ हजार २ शे ४८ जणांना नोटीस बजावत ६ लाख १९ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.वातावरण बदलामुळे शहरात मलेरियाचे १९ आणि डेंग्यूचे ४० सकारात्मक रुग्ण आढळले असून आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळावा असं आवाहन आरोग्य उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केलं आहे. ताप किंवा श्वसनाची लक्षणं दिसल्यास तातडीनं पालिका रुग्णालयात उपचार घ्यावेत असा सल्ला आरोग्य वैद्यकीय अधिकार्यांनी दिला आहे.

**पुरस्कार**

संगीत क्षेत्रातील मानाचा २१ वा 'आशा भोसले पुरस्कार' प्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांना जाहीर झाला आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. येत्या शनिवारी चिंचवड मध्ये पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

**फुटबॉल**

जळगाव इथं झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा वरिष्ठ गट महिला फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेत गतविजेत्या पुणे जिल्हा संघानं मुंबई संघाचा तीन-शून्य असा पराभव करून सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावलं.

श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या अंतिम सामन्याच्या पूर्वार्धात दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला. याशिका तेजवानी हिला स्पर्धेतील तसंच अंतिम सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान मिळाला.

तर रितिका सिंग हिला उत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला. विजेत्या पुणे संघाला करंडक आणि पदक देऊन गौरविण्यात आलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. तर काही ठिकाणी पावसाच्या सरी पडल्या. उद्या देखील आकाश ढगाळ राहून पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**